**ठळक बातम्या**

- लोकसभेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात

- अमेरिकेच्या नौदलानं इराणच्या दिशेने मार्गक्रमण सुरू केल्याचा डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा, अमेरिकेने इराणवर हल्ला केला, तर संपूर्ण प्रदेश युद्धग्रस्त होईल, असा इराणच्या सर्वोच्च नेत्यांचा इशारा

- पाकिस्तानातल्या बलुचिस्तान प्रांतात लष्करी कारवाईत १४५ जण ठार

- वीरभद्रन रामनाथ यांना रॉयल स्वीडीश अकादमी ऑफ सायन्सेसनं २०२६ या वर्षाचा भूविज्ञानासाठीचा क्रॉफर्ड पुरस्कार जाहीर

**आणि**

- धर्मगुरू दलाई लामा आणि के पॉप यांना पहिल्यांदाच ग्रॅमी पुरस्कार

**<><><><><>**

लोकसभेत आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात झाली. राष्ट्रपतींचा संदेश अतिशय महत्त्वपूर्ण होता असं म्हणत केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी धन्यवाद प्रस्ताव मांडला. देशाच्या भविष्याविषयी अतिशय प्रभावी दृष्टीकोन राष्ट्रपतींनी या भाषणात व्यक्त केला. सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकास आणि विकसित भारताचं सरकारचं उद्दिष्ट यात प्रतिबिंबित होत असल्याचं सोनोवाल म्हणाले.

लोकसभेत यावर १८ तास चर्चा होईल आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बुधवारी या चर्चेला उत्तर देतील, अशी माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रीजिजू यांनी दिली. राज्यसभेत यावर १६ तास चर्चा होईल. त्यानंतर केंद्रीय अर्थसंकल्पावरची चर्चा सुरू होईल.

**<><><><><>**

मिटेनी या कंपनीकडून मशीनरी खरेदी रत्नागिरी जिल्ह्यात रसायन प्रकल्प उभा राहत असल्याचा मुद्दा राज्यसभेतले काँग्रेस उपनेते प्रमोद तिवारी यांनी शून्य प्रहरात उपस्थित केला. इटलीसारख्या देशांनी बंद केलेल्या कंपनीकडून वस्तू आणि रसायनांची होणारी खरेदी पर्यावरणासाठी हानीकारक असेल. याचा कोकण किनारे आणि पश्चिम घाटाला फटका बसेल, असा दावा त्यांनी केला. तसंच याप्रकरणी सरकारनं महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अहवाल मागवावा तसंच इतर ठिकाणी बंद करण्यात आलेला प्रकल्प रत्नागिरीत कसा उभा राहिला याची चौकशी करावी अशी मागणी त्यांनी केली.

**<><><><><>**

पुण्यात २०२४मध्ये झालेल्या पोर्श अपघात प्रकरणातल्या तीन आरोपींना सर्वोच्च न्यायालयाने आज जामीन मंजूर केला. सतीश गायकवाड, आदित्य सूद आणि आशीष मित्तल अशी या तीन आरोपींची नावं आहेत. आरोपींनी दाखल केलेल्या जामीन अर्जांवर आज न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि उज्ज्वल भूयान यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. जामीन मंजूर करताना न्यायालयाने अल्पवयीन मुलांचा समावेश असलेल्या गुन्ह्यांसाठी पालकांना जबाबदार धरायला हवं, अशा शब्दांत ताशेरे ओढले. १९ मे २०२४रोजी पुण्यात एका अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवताना धडक दिल्यामुळे दोघांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी रक्ताचा नमुना बदलणं, तसंच सहआरोपींच्या रक्ताच्या चाचण्यांसाठी आपल्या रक्ताचे नमुने देणं, हा आरोप या तिघांवर आहे.

**<><><><><>**

कोलकाता मध्ये गोलपार्क भागात काल रात्री दोन गटांमध्ये झालेल्या चकमकीत दोन जण जखमी झाले. यावेळी दंगलखोरांनी गावठी बॉम्ब फोडले, तसंच गोळीबार आणि दगडफेक केली. या प्रकरणी १० जणांना अटक केली असून, पुढला तपास सुरु असल्याची माहिती स्थानिक पोलिसांनी दिली.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आजपासून तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी अमेरिकेला रवाना होत आहेत. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी आयोजित केलेल्या महत्त्वपूर्ण खनिजविषयक मंत्रिस्तरीय बैठकीत ते सहभागी होणार आहेत. या बैठकीत पुरवठा साखळीची लवचिकता, स्वच्छ उर्जेचं संक्रमण आणि महत्त्वपूर्ण खनिजविषयक धोरणात्मक सहकार्य या विषयांवर चर्चा होणार आहे. या दौऱ्यात डॉ. जयशंकर अमेरिकेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांबरोबर बैठका घेतील, असं परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

‘अब्राहम लिंकन’ या विमानवाहू जहाजाच्या नेतृत्वाखाली अमेरिकेचं नौदल इराणच्या दिशेने निघाल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

अमेरिकेने इराणवर हल्ला केला, तर 'प्रादेशिक युद्ध' होईल असा इशारा इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांनी दिला आहे. ते काल एका जाहीर सभेत बोलत होते. अमेरिकेला इराणवर आणि तिथल्या तेल आणि नैसर्गिक वायूच्या प्रचंड साठ्यावर ताबा मिळवायचा आहे, असं ते यावेळी म्हणाले.

आपल्या देशाचं सशस्त्र दल पूर्णपणे सज्ज असून, प्रादेशिक घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचं इराणचे लष्करप्रमुख अमीर हतामी यांनी म्हटलं आहे. तसंच अमेरिकेची कोणतीही चूक इस्त्रायल आणि संपूर्ण पश्चिम आशियाई प्रदेशाला धोक्यात आणेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

इराणबरोबरच्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी काल देशाच्या लष्करी तयारीचा आढावा घेतला. लष्करप्रमुख इयाल झमीर यांच्या नुकत्याच झालेल्या अमेरिका भेटीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी झमीर यांच्याशी चर्चा केली. इराण विरोधातल्या अमेरिकेच्या संभाव्य कारवाईसह, कोणत्याही परिस्थितीला सामोरं जाण्याची सज्जता आणि समन्वय, या मुद्द्यांवर त्यांनी चर्चा केली.

**<><><><><>**

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात काही हल्लेखोरांनी केलेला गोळीबार आणि बॉम्ब हल्ल्यांच्या मालिकेनंतर, लष्करानं केलेल्या कारवाईत १४५ जणांना ठार केलं. ही लष्करी कारवाई दोन दिवस चालली.

हल्लेखोरांनी सध्या वेशात रुग्णालयं, शाळा, बँका आणि बाजारपेठांमध्ये प्रवेश करून गोळीबार केला आणि नागरिकांना ओलीस ठेवलं, अशी माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली.

‘बलुच लिबरेशन आर्मी’ या फुटीरतावादी गटानं या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली असून, आपण सुरक्षा दलांविरोधात "हेरोफ" किंवा ‘ब्लॅक स्टॉर्म’ नावाचा समन्वित हल्ला सुरू केल्याचं जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

भारतीय वंशाचे हवामान शास्त्रज्ञ वीरभद्रन रामनाथ यांना रॉयल स्वीडीश अकादमी ऑफ सायन्सेसनं २०२६ या वर्षाचा भूविज्ञानासाठीचा क्रॉफर्ड पुरस्कार जाहीर केला आहे. भूविज्ञानाच्या क्षेत्रातला नोबेल म्हणून हा पुरस्कार ओळखला जातो. सुमारे ९ लाख डॉलर आणि सुवर्णपदक असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. ८२ वर्षाचे असलेले रामनाथन कॅलिफोर्निया विद्यापीठात प्रतिष्ठीत प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

कार्बन डाय ऑक्साइडच्या तुलनेत १० हजार पट अधिक कार्यक्षमतेने क्लोरोफ्लुरोकार्बन वातावरणात उष्णता साठवून ठेवतात असा शोध त्यांनी नासामध्ये कार्यरत असताना १९७५ मध्ये लावला होता. तोपर्यंत जागतिक तापमान वाढीला कार्बन डाय ऑक्साइड जबाबदार असल्याचा समज होता. मदुराईमध्ये जन्मलेले आणि चेन्नईत मोठे झालेल्या रामनाथन यांनी सिकंदराबादमध्ये फ्रीजच्या कारखान्यात पहिली नोकरी केली होती.

**<><><><><>**

धर्मगुरू दलाई लामा आणि के पॉप डेमॉन हंटर्सला यंदा पहिल्यांदाचा ग्रॅमी पुरस्कार मिळाला आहे. श्राव्य पुस्तकं, कथाकथन या श्रेणीत Meditations: The Reflections Of His Holiness The Dalai Lama या पुस्तकासाठी दलाई लामा यांना हा पुरस्कार मिळाला. हे व्यक्तीगत यश नसून सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याची प्रतिक्रिया दलाई लामा यांनी दिली आहे. दृकश्राव्य श्रेणीत के पॉप यांच्या गोल्डन या गाण्याला हा पुरस्कार मिळाला. **Music for John Williams** या अल्बमसाठी दिग्दर्शक स्टीव्हन स्पीलबर्ग यांना पहिलाच ग्रॅमी पुरस्कार मिळाला आहे.

**<><><><><>**

१९ वर्षाखालील क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताने पाकिस्तानवर ५८ धावांनी विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. झिम्बाब्वेतील बुलावायो इथं काल झालेल्या या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करत ४९ षटकांत २५२ धावा केल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ १९४ धावांत सर्वबाद झाला.

**<><><><><>**

प्रो रेसलिंग लीग कुस्ती स्पर्धेत काल झालेल्या अंतिम सामन्यात हरयाणा थंडर संघाने दिल्ली दंगल वॉरियर्सला हरवून स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं. हरयाणाच्या नेहा सांगवान हिला महिला गटात सामनावीर घोषित करण्यात आलं तर दिल्ली

दंगल वॉरियरचा रौनक याला पुरुषांच्या गटात लढवय्या खेळाडू म्हणून गौरवण्यात आलं. हरयाणा थंडरचा अक्षय ढेरे यालाही विशेष कामगिरी करणारा कुस्तीपटू म्हणून सन्मानित करण्यात आलं.

**<><><><><>**

जीएसटी दर कपातीनंतर बाजारातल्या वाढत्या मागणीमुळे, 'मारुती सुझुकी इंडिया', आपल्या वाहनांच्या किमती वाढवण्याचा विचार करत असल्याचं कंपनीच्या विपणन आणि विक्री विभागाच्या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. उत्पादनातल्या अडचणींमुळे सध्या मोठी मागणी प्रलंबित असून, केवळ जानेवारी महिन्यातच  त्यामध्ये २ लाख ७८ हजार गाड्यांच्या मागणीची भर पडल्याचं त्यांनी आज  दूरदृश्य प्रणाली द्वारे आयोजित वार्ताहर परिषदेत सांगितलं.

**//<><><><><>//**